# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत मिरा-भाईंदर शहरातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी महत्त्वाचं पाऊल**

मिरा-भाईंदर महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से) यांच्या मार्गदर्शनखाली मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा लाभ 18 ते 35 वयोगटातील युवक आणि युवतींना देणेबाबतची महत्त्वपूर्ण कारवाई मिरा भाईंदर मनपा मार्फत सुरू करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने मनपा कार्यक्षेत्रातील आस्थापना/उद्योजक यांच्यासोबतच रोजगार इच्छुक उमेदवारांनी www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर जाऊन आपलं नाव नोंदणी करणे गरजेचे आहे. या कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत प्रशिक्षणार्थी उमेदवारांना त्यांच्या शैक्षणिक अहर्ताप्रमाणे पुढील ६ महिने DBT ( Direct beneficiary transfer ) पद्धतीने शासनातर्फे विद्यावेतन दिले जाईल. या कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत बारावी पास पासून पदवीधर, आयटीआय मधले पदवीधर,आणि पदव्युत्तर अशा अनेक पात्र रोजगार इच्छुक उमेदवारांना या योजनेचा लाभ घेता येईल. सहा महिन्याचा प्रशिक्षणाचा काळ संपल्यावर विशेष मुलाखत घेऊन तो रोजगार इच्छुक उमेदवार किती सक्षम झाला हे बघून सदर आस्थापना किंवा कंपनी पुढील निर्णय घेतील.

मिरा भाईंदर महानगरपालिका स्वतः ही एक शासकीय आस्थापना असल्याने www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर जाऊन त्यांनी नोंद केलेली आहे. त्याचप्रमाणे मिरा भाईंदर मनपा क्षेत्रातील इतर आस्थापन/ उद्योजकांनी https://www.rojgar.mahaswayam.gov.in या नोंदणी स्थळावर नोंदणी करावयाची आहे. त्यासोबत मिरा भाईंदर मनपाने तयार केलेल्या गुगल फॉर्म मध्ये नोंदणी करायची आहे. हा गुगल फॉर्म मिरा भाईंदर मनपाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे. ज्या रोजगार इच्छुक उमेदवारांना संकेतस्थळावर जाऊन तांत्रिक दृष्ट्या अर्ज भरता येत नाही अशा उमेदवारांसाठी ऑफलाईन पद्धतीने अर्ज स्वीकारण्यात येत आहेत. तसेच त्यांच्यासाठी बुटकँप (सेल्फ स्किल ट्रेनिंग) आणि रोजगार मुलाखतीची पूर्वतयारी यासाठी विशेष प्रशिक्षण मिरा भाईंदर महानगरपालिका तर्फे आयोजित करण्यात येत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका तर्फे मिरा भाईंदर शहरातील सगळ्या गरजू रोजगार इच्छुक उमेदवारांसाठी विशेष उपक्रम राबविले जात आहेत. शहरातील  रोजगार इच्छुक उमेदवारांना रोजगार संदर्भात जनजागृती होऊन प्रत्येक बेरोजगार गरजू युवक युवतींच्या हाताला रोजगार मिळावा एवढीच माफक अपेक्षा मिरा भाईंदर महापालिकेची आहे.  प्रत्येक हाताला रोजगार प्रत्येक घराला आधार या विचाराने प्रेरित होऊन माननीय आयुक्तांनी मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेअंतर्गत www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळाद्वारे शहरातील युवक आणि युवतींना रोजगाराची संधी उपलब्ध करत भविष्यातील बेरोजगारांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्नशील आहेत. तसेच या योजनेचा शहरातील उमेदवारांनी जास्तीत-जास्तीत लाभ घेण्याचे आवाहन मा. आयुक्त श्री. संजय श्रीपतराव काटकर यांच्या वतीने करण्यात येत आहे.